# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे

**स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर स्टुडन्टस् ॲण्ड इन्स्ट्रक्टर्स (GCC-SSD-CTC) जुलै -२०२३**

**(प्रथम सत्र - जानेवारी २०२३ ते जून २०२३)**

**GOVERNMENT CERTIFICATE IN COMPUTER SPECIAL SKILL IN COMPUTER TYPING FOR INSTRUCTORS AND STUDENTS (GCC-SSD-CTC) AUGUST - २०२३**

**(FIRST SEMI. - JAN.2023 TO JUNE 2023 )**

## *अधिसूचना*
## *व*
## *ऑनलाईन*
## *आवेदनपत्र स्वीकृती कार्यक्रम*

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे

१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११००१

**दूरध्वनी क्रमांक□: ०२०-२६१२३०६६/६७**

**E-mail - mscegcctbc@gmail.com**

**Website : www.mscepune.in**

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतील स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर स्टुडन्टस् ॲण्ड इन्स्ट्रक्टर्स**

**(GCC-SSD-CTC) जुलै -२०२३**

**(प्रथम सत्र - जानेवारी २०२३ ते जून २०२३)**

## परीक्षेशी संबंधित अधिकारी

| अ. क्र. | नांव | पद |
|---|---|---|
| १. | श्री. महेश पालकर | अध्यक्ष |
| २. | श्रीमती शैलजा दराडे | उपायुक्त तथा आयुक्त |
| ३. | श्रीमती संगीता घोडेकर | सहाय्यक आयुक्त |
| ४. | श्रीमती संगीता चव्हाण | लेखाधिकारी |
| **ऑनलाईन माहिती भरताना काही तांत्रिक अडचणी आल्यास त्या करीता ०२० - २६१२३०६६/६७ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.** | | |

## महत्त्वाचे

**१) ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याच्या प्रक्रियेत महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत.**

**२) अधिसूचनेचे व संकेतस्थळावरील सर्व सूचनांचे काळजीपूर्वक वाचन करावे.**

**३) कृतीओघ तक्त्याचे (Flow Chart) अवलोकन करुनच आवेदनपत्रे भरावीत.**

**४) संस्था नुतनीकरण प्रत ऑनलाईन पद्धतीने भरल्याशिवाय विद्यार्थ्यांचे ऑनलाईन आवेदनपत्रे भरता येणार नाहीत.**

**५) आवेदनपत्र भरताना फोटो, नाव, सही बाबत कोणत्याही प्रकारच्या चुका होणार नाहीत याची दक्षता विद्यार्थ्यांनी व संस्थाचालक यांनी घ्यावी.**

**६) आवेदनपत्रे भरल्यानंतर ऑनलाईन एकत्रित शुल्क भरणे आवश्यक आहे. यासाठी स्वतंत्र कालावधी दिला जाणार नाही. ऑनलाईन बँकीग, क्रेडीट/ डेबीट कार्डाद्वारे विहित मुदतीत शुल्क भरण्याची दक्षता घ्यावी.**

**(चलन प्रिंट काढून बँकेत जाऊन रक्कम भरण्याचा पर्याय उपलब्ध नाही.**

**७) केंद्र निश्चिती शिक्षणाधिकारी (माध्यमिक)/ उपसंचालक यांचे मार्फत केली जाईल.**

**परीक्षा प्राधान्य:** जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/GCC-SSD-CTC/अधिसूचना/जुलै.-२०२३/२९८१

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,

१७, आंबेडकर मार्ग, पुणे-४११००१

दिनांक :- ११/०५/२०२३

**प्रति,**

**संस्थाचालक / प्राचार्य**

**सर्व शासनमान्य संगणक टायपिंग संस्था,**

**महाराष्ट्र राज्य व गोवा राज्य.**

**विषय :- स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर स्टुडन्टस् अ‍ॅण्ड इन्स्ट्रक्टर्स (GCC-SSD-CTC) जुलै -२०२३ अधिसूचना व ऑनलाईन नोंदणीसह आवेदनपत्र स्वीकृती कार्यक्रम.**

राज्यातील शासन मान्यताप्राप्त संगणक टायपिंग संस्थांमधील नियमित विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत जुलै - २०२३ मध्ये स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर स्टुडन्टस् अ‍ॅण्ड इन्स्ट्रक्टर्स (GCC-SSD-CTC) ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहे. सदर परीक्षेस प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांकडून त्यांच्या संगणक टायपिंग संस्थेमार्फत आवेदनपत्रे ऑनलाईन मागविण्यात येत आहेत.

**प्रथम सत्र** - जानेवारी २०२३ ते जून २०२३ या सत्रासाठी प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांना या परीक्षेसाठी विहित पूर्वअटी पूर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांची ऑनलाईन आवेदनपत्रे जुलै - २०२३ मध्ये होणाऱ्या स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर स्टुडन्टस् अ‍ॅण्ड इन्स्ट्रक्टर्स ( GCC-SSD-CTC) परीक्षेसाठी भरता येतील.

मागील परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या, विद्यार्थ्यांना पुनर्परिक्षार्थी (रिपीटर) म्हणून जुलै- २०२३ मध्ये होणाऱ्या परीक्षेस प्रविष्ठ होता येईल.

**अ) परीक्षेस पात्र होण्यासाठीचे निकष :-**

१. उमेदवार शासनमान्य शाळेतून किमान ८ वी उत्तीर्ण असावा.
२. शासनमान्य संगणक टायपिंग संस्थेत नियमित विद्यार्थी म्हणून प्रशिक्षण पूर्ण केलेले असावे.
३. विद्यार्थ्यांची नोंदणी ऑनलाईन पद्धतीने संबंधित संस्थेमार्फत केलेली असावी.

**आ) शुल्क :-**

१. **परीक्षा शुल्क** :- रु. ५००/- प्रतिविषय/प्रतिविद्यार्थी (नियमित)
रु. ५००+ १००/- प्रतिविषय/प्रतिविद्यार्थी (विलंब)
रु. ५००+१००+अतिविलंब शुल्क रु. ५०/- (प्रति परीक्षार्थी, प्रति विषय, प्रति दिन)

**स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर स्टुडन्टस् ॲण्ड इन्स्ट्रक्टर्स (GCC-SSD-CTC) परीक्षांमधील त्रुटी जसे परीक्षार्थ्याचे स्वत:चे नाव, आडनाव, वडीलांचे/पतीचे नाव, आईचे नाव, विषय बदल, फोटो बदल, बॅच बदल इ. कोणत्याही प्रकारची दुरुस्ती करुन दिली जाणार नाही, याची संबंधित संस्थाचालकांनी व विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी.**

**तसेच विद्यार्थ्यांच्या नावात, आडनावात, वडीलांच्या/पतीच्या नावात किंवा आईच्या नावात फक्त अपवादात्मक परिस्थितीत स्पेलिंग दुरुस्ती असेल व विद्यार्थ्याचे नाव/ आडनाव/ वडीलांचे नावात बदल होत नसेल तरच दुरुस्ती करुन देण्यात येईल.**

उपरोक्त विषयानुसार स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर स्टुडन्टस् ॲण्ड इन्स्ट्रक्टर्स (GCC-SSD-CTC) जुलै- २०२३ (प्रथम सत्र- जानेवारी २०२३ ते जून २०२३) परीक्षांसाठी विद्यार्थ्यांची नोंदणी शुल्कासह आवेदनपत्र भरणेसाठी खालील प्रमाणे लिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार नियमित, विलंब व अतिविलंब शुल्क आकारुन आवेदनपत्र भरता येईल.**

| **अ.क्र.** | **तपशील** | **कालावधी** | **शुल्क आकारणी** |
|---|---|---|---|
| १. | परीक्षेच्या अधिसूचनेपासून | १५ दिवस | नियमित शुल्क रु ५००/-<br>(प्रति विषय, प्रति विद्यार्थी) |
| २. | नियमित शुल्काच्या मुदतीनंतर विलंब शुल्कासह आवेदनपत्र भरणे. | ३ दिवस | नियमित शुल्क रु. ५००/- + विलंब शुल्क रु १००/-<br>(प्रति विषय, प्रति विद्यार्थी) |
| ३. | विलंब शुल्काच्या मुदतीनंतर अतिविलंब शुल्कासह आवेदनपत्र भरणे. | ३ दिवस | नियमित शुल्क ५००/- + विलंब शुल्क १००/- + अतिविलंब शुल्क रु. ५०/- (प्रति परीक्षार्थी, प्रति विषय, प्रति दिन) |

**तसेच अपवादात्मक परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या नावात, आडनावात, वडिलांच्या/ पतीच्या नावात किंवा आईच्या नावात फक्त स्पेलिंग दुरुस्ती असेल तरच परीक्षेपुर्वी रु. २००/- दंड आकारुन देण्यात येईल.**

| **अ.क्र.** | **तपशील** | **कालावधी** | **शुल्क आकारणी** |
|---|---|---|---|
| १. | परीक्षेच्या अधिसूचनेपासून २१ दिवसांपर्यंत दुरुस्ती लिंक सुरु राहील. | २१ दिवस | विनाशुल्क |
| २. | प्रवेशपत्र निर्गमित झाल्यापासून परीक्षेपूर्वी पर्यंत | परीक्षेपूर्वी ३ दिवस अगोदर | रु. २००/- |

**प्रवेशपत्र निर्गमित झाल्यापासून परीक्षेपूर्वीची फक्त स्पेलिंग दुरुस्ती (विद्यार्थ्याचे नाव/ आडनाव/ वडिलांच्या/पतीच्या किंवा आईच्या नावात बदल) होत असल्यास रु. २००/- दंड आकारुन देण्यात येईल. परंतू याबाबतचा प्रस्ताव समक्ष परीक्षा परिषदेत येऊन परीक्षेपुर्वी सादर करावा.**

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे दि. १९/१०/२०१९ चे परिपत्रकान्वये व या कार्यालयाचे पत्र जा.क्र. १४३७ दि. २७/०३/२०२३ नुसार परीक्षेनंतर संस्थाचालकांनी जुलै - २०१९ व त्या पुढील परीक्षांमधील विद्यार्थ्यांचे नाव, वडिलांचे / पतीचे नाव, आडनाव,आईचे नावाचे स्पेलिंग दुरुस्त्या ह्या प्रस्तावास लागणारी कागदपत्रे पूर्ण केल्यानंतरच करुन देण्यात येईल. सदर प्रस्तावानुसार स्पेलिंग दुरुस्तीमुळे पूर्ण नावात, विद्यार्थ्यांच्या नावात, वडिलांच्या / पतीच्या नावात, आडनावात, आईच्या नावात पूर्ण बदल होत असल्यास अशा दुरुस्त्या करुन दिल्या जाणार नाहीत.**

इ) **शुल्क भरण्याची पद्धत**:-

१. संस्थेने सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क परिषदेच्या संकेतस्थळावर देण्यात आलेल्या **लिंकवर संस्था लॉगिनद्वारे ऑनलाईन पद्धतीने भरावे. (चलनाद्वारे किंवा ऑफलाईन पद्धतीने शुल्क भरु नये.)**

२. ऑनलाईन पद्धतीने शुल्क भरुन चलन अपडेट झाल्याशिवाय आवेदनपत्र भरण्याची प्रक्रिया पूर्ण होणार नाही याची नोंद घेण्यात यावी. **(इतर कोणत्याही पद्धतीने परीक्षा शुल्क भरण्यात येऊ नये, ते ग्राह्य धरण्यात येणार नाही व शुल्क परत करण्यात येणार नाही.)**

३. नियमित शुल्क कोणत्याही कारणामुळे विहित कालावधीत न भरल्यास विलंब व अतिविलंब शुल्क लागू होईल.

**ई) परीक्षेची ऑनलाईन आवेदनपत्रे स्विकृतीचा कार्यक्रम (जीसीसी-एसएसडी-सीटीसी) :-**

| अ.क्र. | कालावधी | शुल्क प्रकार | शुल्क (रक्कम) रुपये |
|---|---|---|---|
| १. | दि. १२/०५/ २०२३ ते दि. २६/०५/२०२३ | परिक्षार्थ्यांचे नियमित शुल्कासह आवेदनपत्र भरणे | ५००/- (प्रतिविषय, प्रति परिक्षार्थी) |
| २. | दि. २७/०५/ २०२३ ते दि. २९/०५/२०२३ | परिक्षार्थ्यांचे विलंब शुल्कासह आवेदनपत्र भरणे | (५००/- + १००/-) (प्रतिविषय, प्रति परिक्षार्थी) |
| ३. | दि. ३०/०५/ २०२३ ते दि. ०१/०६/२०२३ | परिक्षार्थ्यांचे अतिविलंब शुल्कासह आवेदनपत्र भरणे | (५००/- + १००/-) + ५०/- (प्रतिविषय, प्रति परिक्षार्थी, प्रति दि-न) |

**टिप :-** ऑ-नलाई-न आवेद-नपत्राची एक प्रिंट काढून विद्यार्थ्यांची स्वाक्षरी, संस्थेच्या स्वाक्षरी व शिक्क्यासह संबंधित संस्थे-ने आपल्या दप्तरी जत-न करुन ठेवावी.

**उ) बँकेचे चलन वाटप :-**

परीक्षा शुल्क केवळ ऑनलाईन पद्धतीने संस्था लॉगिनद्वारे भरावयाचे असल्याने ऑफलाईन चलन देण्यात येणार नाही **(चलनाने शुल्क भरल्यास ते ग्राह्य धरले जाणार नाही.)**

**ऊ) आवेदनपत्राची उपलब्धता:-**

आवेदनपत्रे परिषदेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने भरावयाची आहेत. सदरचे आवेदनपत्रे परिषदेच्या संकेतस्थळावर दि. १२/०५/२०२३ रोजी उपलब्ध करण्यात येत आहेत.

# ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याचा कृतीओघ तक्ता (Flow Chart)

**नियमित (REGULAR)**

www.mscepune.in वेबसाईटला भेट देणे

⇩

GCC- TBC EXAMINATION या Tab वर क्लिक करा.

⇩

ID व Password द्वारे Login करा.

⇩

GCC- TBC Tab वर क्लिक करणे.

⇩

संगणक टायपिंग नुतनीकरण आदेश UPLOAD करणे.

⇩

GCC-SSD-CTC Application form वर क्लिक करणे.

⇩

सर्व माहिती अचूक भरल्याची पुन्हा खात्री करुनच Submit बटनावर क्लिक करा.

⇩

भरलेल्या आवेदनपत्राची प्रिंट काढून त्यावर विद्यार्थी व संस्थाचालकांनी स्वाक्षरी करुन दप्तरी जपून ठेवावी.

⇩

GCC-SSD-CTC Online Payment Tab वर क्लिक करुन विहित मुदतीत ऑनलाईन पध्दतीने संस्था लॉगिनद्वारे परीक्षा शुल्क भरावे.

⇩

सर्व विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरून झाल्यानंतरच Exam Candidates list ची प्रिंट घ्यावी

# ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याचा कृतीओघ तक्ता (Flow Chart)

**पुनर्परिक्षार्थी (REPEATER)**

www.mscepune.in वेबसाईटला भेट देणे

⇩

GCC- TBC EXAMINATION या Tab वर क्लिक करा.

⇩

ID व Password द्वारे Login करा.

⇩

GCC- TBC Tab वर क्लिक करणे.

⇩

संगणक टायपिंग नुतनीकरण आदेश UPLOAD करणे.

⇩

GCC-SSD-CTC Application Form Repeater वर क्लिक करावे.

⇩

Candidate List समोरील Apply बटनावर क्लिक करुन त्यामधील मुद्देनिहाय अचूक माहिती भरा.

⇩

Apply केलेल्या सर्व विद्यार्थ्यांच्या यादीचे अवलोकन करणे.

⇩

भरलेल्या आवेदनपत्राची प्रिंट काढून त्यावर विद्यार्थी व संस्थाचालकांनी स्वाक्षरी करुन दप्तरी जपून ठेवावी.

⇩

GCC-SSD-CTC Online Payment Tab वर क्लिक करुन विहित मुदतीत ऑनलाईन पध्दतीने संस्था लॉगिनद्वारे परीक्षा शुल्क भरावे.

⇩

सर्व विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरून झाल्यानंतरच Exam Candidates list ची प्रिंट घ्यावी

## ऐ) ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याबाबत सूचना :-

### A. सर्वसाधारण सूचना :-

१. ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याकरीता प्रथमत: परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळास भेट द्यावी.

२. सदर संकेतस्थळावरील G.C.C.- T.B.C. Examination वर Click करावे. त्या-ंतर स्क्रिनवर Login चा बॉक्स दिसेल त्यामध्ये दिलेली माहिती भरावी व Login करावे.

३. ऑनलाईन आवेदनपत्र भरताना चुका होऊ -नयेत म्हणून संस्थाचालकांनी / प्राचार्यांनी विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत आवेदनपत्र अचूक भरावे.

४. आवेदनपत्रात विद्यार्थ्यांची संपूर्ण माहिती जसे की, Name, Sub, Address, Gender, General Register no. व Handicaped या बाबी नमुद करावेत. त्या-ंतर Submit बट-ावर Click करावे. Submit या बट-ावर Click केल्यानंतर आवेद-पत्रामध्ये कोणताही बदल केला जाणार नाही याची गांभीर्याने -ोंद घ्यावी. अंध विद्यार्थ्यांबाबत सनेत्रवाचक (मदतनीस) हवा असल्यास सनेत्र वाचकाची माहिती अचूक भरावी. Online payment संस्था लॉगिनद्वारे एकत्रितपणे भरावे.

५. **आवश्यक पुर्वअट पूर्ततेबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.**

६. **आवेदनपत्र भरताना पूर्वअट पूर्ततेची कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावीत.**

७. **आवेदनपत्र भरताना पूर्वअट पूर्ततेच्या कागदपत्रांबरोबर आधारकार्ड व बोनाफाईड सर्टीफिकेट / शाळा सोडल्याचा दाखला ही कागदपत्रेही अपलोड करावीत.**

८. **Submit केलेल्या आवेद-पत्राची व इतर कागदपत्रांची प्रिंट काढून ठेवावी. त्यावर विद्यार्थी व संस्थाचालकां-ी स्वाक्षरी करुन नाव व संस्था कोड लिहावा व आपल्या दप्तरी जपून ठेवावी.**

## ओ) संस्थाप्रमुख व विद्यार्थी यांच्यासाठी महत्त्वाच्या बाबी :-

१. सदर परीक्षा ही फक्त जी.सी.सी.-एस.एस.डी-सी.टी.सी या विषया करीता घेण्यात येणार आहे.

२. संस्थेने आपल्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे नोंदणी (Registration) आवेद-पत्र (Application Form) पूर्ण भरल्या-ंतर आवेद-पत्राची प्रिंट काढून ठेवावी. -ाव (स्वत:चे नाव, आडनाव, आई, वडिलांचे/ पतीचे नाव), विषय, फोटो बरोबर असल्याची खात्री करुन विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी. सदर आवेदनपत्राची प्रत संस्थेत जतन करुन ठेवावी.

प्रवेशपत्र निर्गमित झाल्यानंतर वा परीक्षेनंतर कोणताही बदल केला जाणार -ाही. संगणकीय/ मुद्रण दोषामुळे चुक झाल्यास जतन केलेल्या आवेदनपत्राची प्रत सादर केल्यानंतरच प्रमाणपत्रावर दुरुस्ती केली जाईल.

३. **परिषदे कडून देण्यात आलेली बॅच मध्ये कोणताही बदल केला जाणार नाही.** परीक्षार्थ्यांना शक्यतो टंकलेखन संस्थेच्या जवळचे परीक्षा केंद्र परिषदेकडून दिले जाईल. मात्र कमी विद्यार्थी संख्या, आवश्यक साधन सामग्रीची उपलब्धता न होणे या बाबींमुळे अन्य / दूरचे परीक्षा केंद्र दिले जाईल. परीक्षा परिषदेच्या स्तरावरुन देण्यात आलेल्या परीक्षा केंद्रात कोणत्याही परिस्थितीत केंद्र बदल केला जाणार नाही.

- परीक्षा केंद्र विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देणेची कार्यवाही महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे कार्यालयामार्फत करण्यात येईल. यासाठी स्वतंत्र कालावधी दिला जाईल.

४. परीक्षेपूर्वी ५ दिवस अगोदर पात्र उमेदवारांची **प्रवेशपत्रे (हॉलतिकीट )** संस्थाना परिषदेच्या संकेतस्थळावर संस्थांच्या लॉगिनमध्ये ऑनलाईन दिली जातील. त्यानुसार संस्थांनी आपल्या संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्राची प्रिंट काढून संस्थेच्या सही व शिक्क्यासह परीक्षेपूर्वी किमान दोन दिवस अगोदर विद्यार्थ्यांना वितरीत करावीत.

५. **परीक्षार्थीनी भरलेले परीक्षा शुल्क कोणत्याही सबबीवर परत मिळणार नाही याची उमेदवारांनी व संस्थाचालकांनी नोंद घ्यावी. त्यामुळे अतिरिक्त शुल्क भरण्यात येवू नये.**

६. परीक्षा शुल्काच्या ऑनलाईन पावतीवर दिनांक, संस्थेचे नांव व सांकेतांक असल्याची खात्री करावी.

७. आवेदनपत्रात खोटी माहिती देणे, आवेदनपत्रासोबतच्या दस्तऐवजात खाडाखोड करुन सादर करणे या कारणांमुळे उमेदवार परीक्षेसाठी कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरेल व त्याची / तिची सदर परीक्षेची संपादणूक रद्द होईल. तसेच संबंधित संस्थेचा सांकेतांक रद्द करण्यात येईल.

८. परीक्षार्थी, संस्थाप्रमुख व प्राचार्य यांनी आवेदनपत्रावरील Submit या बटनावर क्लिक करण्यापूर्वी आवेदनपत्रामधील आवश्यक असलेले सर्व रकाने बरोबर भरले असल्याची खात्री करावी.

**९. संस्थाचालकांनी संस्था नुतनीकरण न करता विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ करु नयेत. विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ केल्याचे निदर्शनास आल्यास आपल्या संस्थेचा सांकेतांक रद्द करण्यात येईल.**

**१०. परीक्षार्थीचे एक विषयासाठी एकच आवेदनपत्र भरावे. एकाच विषयाची एकापेक्षा जास्त आवेदनपत्रे भरल्यास त्या विषयाची सर्व आवेदनपत्रे रद्द करण्यात येतील, त्यामुळे याबाबत गांभीर्याने नोंद घ्यावी. परीक्षार्थीनी एकाच विषयाची एकापेक्षा जास्त आवेदनपत्रे त्याच किंवा इतर संस्थेमधून भरली नसल्याची संस्थाप्रमुखांनी खात्री करावी. तसे हमीपत्र परीक्षार्थ्यांकडून घेऊन आपल्या दप्तरी ठेवावे.**

**११. संस्थाप्रमुखांने कोणत्याही अनधिकृत संगणक टंकलेखन संस्थेच्या परीक्षार्थ्यांचे आवेनदनपत्र आपल्या संस्थेमार्फत भरु नयेत. तसे निदर्शनास आल्यास सदर भरलेली सर्व ऑनलाईन आवेदनपत्रे रद्द करण्यात येतील व आपल्या संस्थेची शासन मान्यता काढून घेण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.**

**१२. विद्यार्थी /संस्थाचालक यांनी आवेदनपत्रात नमूद केलेली माहिती चुकीची आढळल्यास सदर विद्यार्थ्याचा निकाल कोणत्याही टप्प्यावर रद्द केला जाईल.**

**१३. विद्यार्थ्यांचे बॅच बदल, विषय बदल याबाबतचे ई-मेलव्दारे अथवा प्रत्यक्ष/ समक्ष प्राप्त होणरे प्रस्ताव/अर्ज यांची दखल घेतली जाणार नाही. याची नोंद सर्व संबंधितांनी घ्यावी.**

**१४. आवश्यक पूर्वअट पूर्ततेबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.**
**(संदर्भ - शासनपरिपत्रक क्र:- संकिर्ण-२०१६/प्र.क्र.११/एसडी-२, दिनांक २४ एप्रिल २०१७)**

| SR. NO. | NAME OF THE SUBJECT & SPEED | SUBJECT CODE | PRECONDITIONS REQUIRED |
|---|---|---|---|
| 1 | GCC-SSD-CTC | 45 | ENG 40 + MAR/HINDI 30 |

१४. पूर्वअटींच्या संदर्भात जोडलेल्या प्रमाणपत्रामधील व आवेदनपत्रामधील नावांत बदल असेल तर नाव बदलाबाबत पुढील कागदपत्रांपैकी
संबंधित विद्यार्थ्यांनी स्व-साक्षांकित केलेला कोणताही एक पुरावा आवेदनपत्रासोबतच्या कागदपत्रांमध्ये जोडावा.
(अ) राजपत्रामधील नाव बदलाची नोंद.
(ब) न्याय दंडाधिकारी/न्यायालय यांनी नाव बदलासाठी दिलेले आदेश.
(क) समक्ष प्राधिकायाने (विवाह नोंदणी रजिस्ट्रार) विवाह नोंदणी केल्याचा दाखला.

***स्वाक्षरित /-***
**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-४११ ००१.**

**प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव:-**

१. विभागीय शिक्षण उपसंचालक सर्व, महाराष्ट्र राज्य.
२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद सर्व, महाराष्ट्र राज्य.
३. शिक्षण निरीक्षक, बृह-मुंबई (उत्तर/दक्षिण/पश्चिम)

**प्रत माहितीस्तव सवि-नय सादर:-**

१. मा. सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२. मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे

# परीक्षा विद्यार्थी यादी नमुना

## G.C.C. EXAMINATION (GCC-SSD-CTC) JULY - 2023 Candidate list

PAGE NO. : ____

**NAME OF THE INSTITUTE :** ________________________________

**INSTITUTE CODE NO.:** ☐☐☐☐☐

*USE CODE NUMBERS ONLY ( To be filled in by the Head of the Institute )

| Sr. No. | Name Of The Candidate | Form No. | Instt. Gen. Register No. | Subject Code No. | Signature Of Candidate |
|---|---|---|---|---|---|
| | | | | ☐☐ | |
| | | | | ☐☐ | |
| | | | | ☐☐ | |
| | | | | ☐☐ | |
| | | | | ☐☐ | |
| | | | | ☐☐ | |
| | | | | ☐☐ | |
| | | | | ☐☐ | |
| | | | | ☐☐ | |
| | | | | ☐☐ | |
| | | | | ☐☐ | |

This is to Certify that the above enlisted candidates are the confide students of this Institute. They have fulfilled all the conditions required for appearing at the **GCC-SSD-CTC** Examination as per the rules and each candidates has signed personally.

*** Subject Code :- GCC-SSD-CTC : 45**

SEAL OF THE INSTITUTE

**Phone No.---------------------------**

**E-mail Id. ----------------------------**

SIGNATURE

HEAD OF THE INSTITUTE